# स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

### नियमित उपक्रम अहवाल शै.वर्ष २०१८-१९

**१) आंतरराष्ट्रीय योगदिन :- २१ जून २०१८**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमीत्ताने विभागाच्या वतीने दिनांक २१ जून २०१८ रोजी सकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत योग-प्राणायाम शिबीराचे आयोजन करण्यात आले होत या शिबीरास मार्गदर्शक म्हणुन पतंजली योग समीती बीड चे योग गुरु मा.श्रीराम मोरे उपस्थित होते या शिबीरामध्ये श्री. मोरे यांनी सर्व उपस्थितांकडून योग प्राणायामची प्रात्यक्षिके करूण घेतली

**२) वृक्षरोपन कार्यक्रम :-**

महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडीच्या उद्‌दीष्टाला प्रतिसाद देत विभागाच्या वतीने दिनांक १८ जुलै २०१८ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विद्यासागर जोशी,उपप्रायार्च डॉ.बाहेगव्हाणकर,डॉ राजेश ढेरे कार्यक्रम अधिकारी अशोक डोके, डॉ. सोपान सुरवसे, प्रा.सौ. दिपा देशपांडे सर्व प्राध्यापक व स्वयंसेवकांच्या उपस्थितीमध्ये एकुण उपयुक्त अशा ५० वृक्षांचे रोपन करण्यात आले.

**३) आण्णाभाऊ साठे जयंती व लो.टीळक पुण्यतिथी कार्यक्रम : -**

दिनांक १ ऑगस्ट २०१८ रोजी थोर साहीत्यिक आण्णाभाऊ साठे यांची जयंती व थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य टीळक यांची पुण्यतीथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जोडुनच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डा.विद्यासागर जोशी यांचा शुभेच्छा कार्यक्रम व नुतन प्राचार्य डॉ.संजय शिरोडकर यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून भा.शि.प्र.संस्थेचे सहकार्यवाह मा.प्रा.चंद्रकांत मुळे उपस्थित होते. स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह मा. मिलींद चिंचपुरकर संस्थेचे सभासद मा. आडेसर उपस्थित होते.

**४) शिक्षक दिन कार्यक्रम :-**

५ सप्टेंबर २०१८ रोजी शिक्षक दिनाच्या निमीत्ताने डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतीमेचे पूजन करूण अदरांजली अर्पण करण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिरोडकर यांनी शिक्षक व विद्यार्थाशी संवाद करूण सर्व शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.अशोक डोके यांनी केले तर प्रा.डॉ.सोपान सुरवसे यांनी अभार व्यक्त केले.

**५) पर्यावरणपुरक गणेशमुर्ती प्रशिक्षण कार्यशाळा :-**

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रा.से.यो. आणि अजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने दिनांक ८ सप्टेंबर २०१८ रोजी महाविद्यालयातील तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपुरक गणेशमुर्ती प्रशिक्ष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस प्रशिक्षक म्हणुन प्रा.डॉ.जोगेंद्र गायकवाड उपस्थित होते

**६) आंतरराष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंध रॅलीमध्ये सहभाग :-**

१० सप्टेंबर २०१८ रोजी जिल्हा रूग्णालय बीड यांच्या वतीने बीड शहरामध्ये आंतरराष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या नितीत्ताने प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते या रॅली मध्ये स.से.यो. विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक डोके, प्रा.नारायण शिंदे मानसशास्त्र विभागप्रमूख प्रा. सुहास जोशी व स्वयंमसेवक सहभागी झाले होते.

**७) रा.से.यो. वर्धापन दिन :-**

दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी विभागाच्या वतीने रा.से.यो. विभागाच्या वर्धापन  दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणुन प्रख्यात कथाकार प्रा.डॉ. भास्कर बडे उपस्थित होते. डॉ.बडे यांनी समाजातील वास्तव परस्थितीमध्ये स्वयंसेवकाची भूमीका स्पष्ट करून स्वत:ची ग्रामीण भागातील खिल्लाऱ्या बैलाची कथा सांगुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

**८) संविधान दिन :-**

दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान दिनाच्या निमीत्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान दिनाच्या निमीत्ताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले तसेच सामूहीकपणे संविधानाच्या उद्देशीकेचे वाचन करण्यात आले या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॅ.संजय शिरोडकर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेबव्हाणकर उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे उपस्थित होते.

**९) एड्स जनजागरण प्रभात फेरीत सहभाग :-**

दिनांक १ डिसेंबर २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय एड्स दिनाच्या निमीत्ताने जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाच्या वतीने बीड शहरामध्ये एड्स जनजागरण प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

### १०) डॉ.बा.आंबेडकर महापरिनिर्वाहन दिन:-

दि.६ डिसेंबर २०१८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाहन दिनाच्या निमीत्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले या प्रसंगी डॉ.आंबेडकर यांचे जीवन व कार्य या विषयावर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.ज्योतीश्वर भालेराव यांचे बीड आकाशवाणी वरील भाषण सामूहीकरीत्या ऐकण्यात आले.

### ११) सर्जीकल स्ट्राईक डे :-

महाविद्यालयातील रा.से.यो. विभाग व अ.शि. विस्तार सेवा विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ सप्टेंबर २०१८ रोजी सर्जीकल स्ट्राईक डेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख अतीथी म्हणुन माजी सैनीक आधिकारी मा. ज्ञानेश्वर राऊत उपस्थित होते श्री. राऊत यांनी सैनीक देशाच्या सीमांचे रक्षण कोणत्या आणि कशा -परस्थितीमध्ये करतात हे स्वअनुभवातुन विद्यार्थांना सांगीतले.

### १२) व्यसनमुक्ती रॅली :-

दिनांक ३० डिसेंबर २०१८ रोजी शिवसंग्राम प्रतिष्ठाण बीड यांच्या वतीने बीड शहरामध्ये सामाजिक प्रश्न व्यसनाधिनता विरोधी जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते सदरील रॅली राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राष्ट्रीय सहभाग घेतला होता.

### १३) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये सहभाग :-

रा.से.यो. विभागातील स्वयंसेविका कु. ऋतुजा विजयकुमार आंबेकर या विद्यार्थीनीने दि. २५ नोव्हेंबर २०१८ ते ४ डिसेंबर २०१८ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ नागपूर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय पुर्व प्रजासत्ताक दिन संचलन प्रशिक्षण व निवड शिबीरात सहभगी होवुन त्यामध्ये तीची निवड झाली.

### १४) रक्तदान शिबीर (दि.०८.०३.२०१९) :-

**महिला दिन** निमित्त ०८ मार्च २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने **रक्तदान शिबीराचे** आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहकार्यवाह मा.प्रा.चंद्रकांत मुळे , प्राचार्य डॉ.संजय शिरोडकर, डॉ.सौ. साधना गंगावणे , रक्त सक्रमण अधिकारी सौ.बांगर मॅडम,सौ. ढाकणे हे उपस्थित होते. या शिबीरात एकुण ३० विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी रक्तदान केले.